International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# वारकरी संत साहित्यातील मानवतावादी विचार

**डॉ. कांचन विजय नलावडे**

*सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा*

*Corresponding Author – डॉ. कांचन विजय नलावडे*

DOI - 10.5281/zenodo.18654290

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र ही शूरांची, वीरांची आणि संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. यादवकाळामध्ये नाथ, महानुभाव आणि वारकरी असे संप्रदाय लोकप्रिय होते. अर्थातच वारकरी संप्रदायाचा प्रभाव अधिक होता हे मान्य करावे लागते. वारकरी संप्रदायाचा भागवत धर्म म्हणजेच सनातन वैदिक धर्माचेच एक व्यापक आणि विकसित रूप आहे. आषाढी कार्तिकी एकादशीस वारी करतो तो वारकरी. अर्थातच ही वारी पंढरपूरची असते. गळ्यात तुळशीची माळ घालतो तो माळकरी. वेद, भगवद्गीता व भागवत या ग्रंथाबद्दल वारकऱ्यांना आदर आहे. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकोबाची अभंगगाथा या तीन ग्रंथाना या संप्रदायात प्रस्थानत्रयीचे महत्व असल्याने हे ग्रंथ पूजनीय आहेत. सर्वाभूती परमेश्वर मानून, समतेची पताका खांद्यावर घेवून भेदाभेद भ्रम अमंगळ मानणाऱ्या या संप्रदायाने मोठी सामाजिक क्रांती करून शूद्रांना अध्यात्माच्या भक्तीच्या मुख्य प्रवाहात आणले आणि सामाजिक क्रांती केली. संतांनी कीर्तन, प्रवचन, भारुड, गवळणी, ओव्या, अभंग यांच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट प्रथांना विरोध करून लोकांना सन्मार्थ दाखविण्याचा प्रयत्न केला.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. संत संप्रदायाचे स्वरूप समजावून घेणे.
2. संत कवीच्या काव्यातील सामाजिकतेचा अभ्यास करणे
3. संत कवींची मानवतावादी भूमिका समजून घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करून शोध निबंधाची मांडणी केलेली आहे.

**वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान व आचारधर्म:**

वारकरी संप्रदाय हा भक्तिवादी संप्रदाय आहे. त्यांच्या तत्वज्ञानात पांडित्य नाही. त्यांनी हरिहराचे ऐक्य प्रतिपादन करून वेदांना प्रमाण मानले. या संप्रदायाच्या तत्वज्ञानाबद्दल डॉ. विकास कदम म्हणतात, “ या संप्रदायातील संतापैकी कोणीही संन्यासवृत्तीचा उपदेश केला नाही व करत नाही. उलट स्वतः मुक्त बनून आपण ज्या मार्गाने मुक्त झालो त्याचे जगास ज्ञान करून देतात म्हणजेच हा संप्रदाय सगुणोपासक आहे. परमात्मा व्यापक, निर्गुण, निराकार आहे हे ही मान्य तसाच तो सगुण साकार आहे हे सुद्धा मान्य आहे."[१] ‘ कर्मठपणा, व्रतवैकल्ये, संन्यास इ. गोष्टींचा त्याग या संप्रदायाने शिकविला. या संप्रदायाचा आचारधर्मही सर्वसामान्य लोकांना जवळचा वाटला. या संप्रदायाच्या आचारधर्माचा उल्लेख विश्वकोशामध्ये केलेला आहे तो असा, “ वारकरी संप्रदायाची दीक्षा घेण्याचा विधी अगदी सोपा असतो. ह्या संप्रदायात फड (प्रत्येक महंताच्या वा वारकरी

साधुच्याभोवती असलेला त्याच्या शिष्यमंडळीचा समुदाय) असतात. दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्या अशा एखाद्या फड प्रमुखाकडून तुळशीच्या १०८ मण्यांची माळ घालून घ्यावी लागते.

**दीक्षेची पद्धत अशी**: ही माळ आणून दीक्षा देणाऱ्या साधूकडे वा फडप्रमुखाकडे जावयाचे. तो ती माळ ज्ञानेश्वरीवर ठेवतो आणि प्रतिवर्षी पंढरीची वारी करण्याचे वचन दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याकडून घेतो. संप्रदायाच्या इतर नियमांची आणि आचारधर्माची कल्पनाही दीक्षा घेणाऱ्याला फडप्रमुख देतो. हे नियम असे आहेत. १) सत्य बोलावे. २)परस्त्री मातेसमान मानावे. ३) कांदालसूण आणि मांसाहार वर्ज्य करावा. ४)मद्यपान वर्ज्य करावे. ५) रोज हरिपाठ करावा तसेच ‘रामकृष्णहरी’ या मंत्राचा जप करावा. ६) प्रपंचातील कर्मे श्रीविठ्ठल स्मरण करीत पार पाडावी. हे सर्व नियम पाळण्याचे कबूल करून ज्ञानेश्वरीवर ठेवलेली तुळशीच्या मण्यांची माळ तो भक्त उचलतो आणि ‘पुंडलिक वरदा हरिविठ्ठल’ ह्या गजरात गळयात घालतो. वारकऱ्यांच्या आचारधर्माचा आणखी एक भाग म्हणजे त्याने गोपीचंदनाचा गंध कपाळी लावला पाहिजे.”[२] वारकरी संप्रदायात दया, क्षमा, शांती, अहिंसा, समता व मानवता या समाजजीवनास उपयुक्त असणाऱ्या मूल्यांनाच महत्व दिलेले दिसून येते. यज्ञयाग, कर्मकांड, सोवळे ओवळे, होमहवन या बाह्य गोष्टीला थारा न देता परमेश्वरी भक्तीचा सरळ व साधा असा मार्ग वारकरी संप्रदायाने स्वीकारला. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी समदृष्टीने, सहानुभूतीने आणि वैश्विक करुणापूर्णतेने जगणारा समाज निर्माण करण्याचे कार्य केले आहे. याचे विवेचन या शोधनिंबधात केले आहे.

**संतांचे कार्य व मानवतावाद:**

संतांनी सर्वसामान्यांना भक्तीमार्ग कळावा त्यांचा आत्मिक विकास व्हावा या हेतूने स्वत:च्या आदर्श आचरणाबरोबरच आलेल्या अनुभवातून ग्रंथरचना केली. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व इतर संतांनी निरनिराळया ग्रंथातून लोकांना आचारधर्म सांगितला. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले. ज्ञानेश्वरांचा पसायदानाचा विचार हा वारकरी संप्रदायाचा पाया आहे. ‘भावार्थ दीपिका’ ग्रंथाचा शेवट करताना ज्ञानेश्वरांनी पसायदान मागितले यातून त्यांनी अखिल विश्वातील प्राणीमात्रांसाठी विश्वव्यापी परमेश्वराला जे दान मागितले ते म्हणजे हे ‘पसायदान’ होय.

‘दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥

माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या वाईट प्रवृत्तींचा नाश होऊ दे. त्यांच्यामध्ये आंतरिक स्नेहबंध निर्माण होऊ दे आणि प्रत्येक प्राणिमात्राला स्वधर्माच्या अनुषंगाने जे जे हवे ते ते मिळू दे असा व्यापक अर्थ प्रतिपादन केलेला आहे. ‘हे विश्वची माझे घर’ असा विचार मांडणारे ज्ञानेश्वर तत्कालीन आणि समकालीन स्वार्थबुद्धी व संकुचित वृत्तीच्या जनमाणसाबरोबरच संपूर्ण जगाला आपलं मानून वाटचाल करण्याची दिशा दाखवितात.

संत नामदेवांनी ही लडिवाळ लेकराने मातेवर प्रेम करावे, तशी ईश्वरभक्ती करण्याचा आदर्श निर्माण केला. सर्वसामान्यांना आत्माविष्काराची वाट मोकळी करून दिली. त्यांनी आपल्या उद्धाराबरोबरच समजोद्धारासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची केले. ‘नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी।' अशा कीर्तन कलेच्या माध्यमातून त्यांनी भागवत धर्माचा लोककल्याणाचा प्रचार – प्रसार केवळ महाराष्ट्रात नाही तर पंजाब, गुजरात, राजस्थान अशा अनेक राज्यामध्ये केला. समाजातील भावनिक एकात्मता टिकवून ठेवण्याचे अवघड काम त्यांनी केले. अस्पृश्यता, कर्म- कांड याला तिलांजली देत समाजाला सुख-शांती मिळविण्यासाठी

व आत्मिक प्रगती साधण्यासाठी नामस्मरणाचा सोपा भक्तीमार्ग दाखवून दिला. “नामदेवकालीन समाजात वर्णव्यवस्थेचे पालन कठोरपणे होई. अशा परिस्थितीत नामदेवांनी समाजातील जातिभेदाला चंद्रभागेच्या वाळंवटा पुरती तरी मुठमाती दिली ‘ देव भावाचा भुकेला। याति कळे नाही त्याला।' असे स्पष्टपणे सांगितले,”[३] नामदेवांची ही शिकवण मानवतेची जोपासना करते. गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, सेना न्हावी इ. संतांची मालिकाच उभी राहिली. विठ्ठलभक्तीने भारावलेले विविध जातीचे लोक विठ्ठलभक्तीरुपी रचना करू लागले. संत ज्ञानेश्वर आणि नामदेवांनी वारकरी संप्रदायातून देवाची भक्ती करण्याचा अधिकार सर्वाना आहे असा विचार मांडला. सदाचार, सद्वर्तन व मानवतावादाच्या भूमिकेतून जगण्याची शिकवण संतांनी सर्वाना दिली. याविषयी डॉ. संदीप सांगळे म्हणतात, “संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत कर्ममेळा, संत निर्मळा, संत बंका, संत जनाबाई आणि संत कान्होपात्रा यांनी निर्माण केलेले मध्ययुगीन काळातील वाड्.मय समाजाला दिशा आणि प्रेरणा देणारे ठरले. आधुनिक काळातही या सर्व साहित्यिकाचे वाड्.मय सातत्याने समाजाला ऊर्जा देते आहे.’’[४] या सर्व संतांनी समाजाला उत्तम जीवन जगण्यासाठी प्रेरित केले.

बहिणाबाईनी भागवत मंदिराचे चित्र रेखाटताना ‘जनार्दनी एकनाथ। खांब दिला भागवता।’ असे संत एकनाथांबद्दल गौरवोद्गार काढले. संत एकनाथांना द्या, क्षमा शांतीचे प्रतिक म्हणून संबोधले जाते. एकनाथांनी आपल्या आख्यानक कविता, गवळणी , अभंग, भारुडे आणि स्फुट गद्य अशा लेखनातून जनजागृती केली. समाजदर्शन घडविले.

‘विंचू’ या भारूडातून ‘मनुष्य इंगळी अति दारूण’ असा जोरदार फटका मारला तर ‘सासुरवास’ या भारूडातून माणसातील अहंकार नाहीसा व्हावा अशी इच्छा व्यक्त केली. सामाजिक नीती आणि मानवतेचे धडे लोकांना दिले. चुकलेले अस्पृश्याचे मुल कडेवर घेतले. काशीचे गंगोदक तहानलेल्या गाढवाला पाजले अशा कितीतरी उदाहरणांवरून त्यांचा सर्वस्पर्शी भूतदयेचा प्रत्यय येतो. त्यांच्या वर्तनातील दया, क्षमा, शांती ही मूल्ये समाजास हितकारक ठरली आहेत. एकनाथांनी प्रपंच आणि परमार्थ, ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यात सांगड घालून समन्वयवादाची विचारसरणी सर्वांपर्यंत पोहोचविली याचा प्रत्यय आपणास त्यांचे साहित्य वाचल्यानंतर निश्चितच येतो.

वारकरी संप्रदायाचा कळस ठरलेल्या संत तुकारामांनी तर आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाजात असलेल्या अनिष्ठ प्रथा, रूढी, रीतीरिवाज, व्रतवैकल्य, जत्रा–यात्रा, जादूटोणा, बुवाबाजी इ. गोष्टींवर प्रहार केला. तुकारामांचे जीवन चिंतन हा एक वेगळाच अभ्यासाचा विषय राहिला आहे.

१) जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी।
२) उंच निंच काही नेणे हा भगवंत। तिष्ठे भाव भक्त देखोनिया।
३) विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।
४) ‘जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा।।
५) बुडते हे जन न देखवे डोळा। म्हणोनि कळवळा येतो आम्हा।
६) ‘जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे।’
७) वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षी ही सुस्वरे आळविती ।
८) चित्त समाधाने । तरी विष वाटे सोने ।
९) चाकरीवाचून खाणे अनुचित वेतन ।
धनी काढोनिया निजा, करीले ये कामाची पूजा ।
१०) एकमेका साह्य करू ।अवघे धरू सुपंथ ।

संत तुकारामांनी जनसामान्यांना ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखविला. वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. संत तुकारामांनी वास्तववादी, निर्भिड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार केले. त्यांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनातून समाजाला अचूक मार्गदर्शन केले. लोकांना सत्याचा मार्ग दाखविला. त्यांचे विचार लोकांच्या मनीमानसी इतके रुळले की, समाजजीवनात आणि लोकभाषेत ते एकरूप झाले. लोकव्यवहारात तुकारामांचे अनेक अभंग आणि त्यातील मौलिक विचार सुभाषितासारखे समाजाला सत्याचे, मानवतेचे दिग्दर्शन करताना दिसतात. याविषयी डॉ. ल.रा. नसिराबादकर म्हणतात, " रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरून प्रेम आणि वात्सल्याची उधळण करणारा, प्रसंगी कठोर आणि परखड बनून जीवनभाष्ये करणारा, जनात जनार्दन शोधून मानवतेची द्वाही फिरवणारा तुकाराम हा महाकवी होता."[५] एकूणच संत परंपरेतील अनेक संतांनी कर्मकांड मानवताविरोधी आचरणांचा नेहमीच धिक्कार केला आहे.

**समारोप**:

वारकरी संप्रदायातील संतांनी सामाजिक समतेचा आणि वैश्विक भावाचा विचार सतत आपल्या काव्यांतून मांडलेला आहे. आजच्या धर्मांधता, जातीयता, युद्धजन्य परिस्थिती यामध्ये गुंतलेल्या धकाधकीच्या जीवनात संत साहित्य हेच दिशादर्शक आहे.

**संदर्भ:**


१) कदम विकास – 'पंढरपूर व वारकरी संप्रदायाचा इतिहास', अरुणा प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती १२ जुलै २०१९, पृ.५६
२) मराठी विश्वकोश – महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई १९९९ , खंड १६ वा पृ.७६
३) ल. रा. नसिराबादकर - 'मध्ययुगीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास,' भारती मुद्रणालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, २०२३, पृ.१०७
४) सांगळे डॉ. संदीप – 'मध्ययुगीन दलित संतकविता : सामाजिक व **वाङ्.म**यीन मूल्यमापन', संस्कृती प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1 नोव्हेंबर २०२२, पृ. १०
५) ल. रा. नसिराबादकर - 'मध्ययुगीन मराठी वाङ्.मयाचा इतिहास,' भारती मुद्रणालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, २०२३, पृ.१९१